2 8 MAY 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात 'आव्हान'द्वारे आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

## १ ते १० जून या कालावधीत एनएसएसचे शिबिर : राज्यभरातील विद्यापीठातून स्वयंसेवकांची उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात एनएसएसतर्फे 'आव्हान' या राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरातून आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येणार आहेत. राज्यपालांच्या सूचनेवरून १ ते १० जून या कालावधीत होणाऱ्या शिबिराला राज्याभरातील विद्यापीठातून १ हजार २०० स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी सहभागी होणार आहेत. नैसर्गिक मानवनिर्मित आपत्ती व्यवस्थापन कसे करावे याबाबत उद्भवल्यास कशा पद्धतीने सामोरे जावे, 'एनसीसी' स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने दरवर्षी आव्हान शिबिर घेतले जाते.

राष्ट्रीय आपत्तकालीन प्रतिसाद दलातर्फे एनएसएसच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. या शिबिरात तज्ज्ञ मार्गदर्शन प्रात्यक्षिकाचे धडे देणार आहेत. विद्यापीठ प्रशासनातर्फे या शिबिराची तयारी वेगाने सुरू आहे. या शिबिराची तयारी करण्यासाठी २७ समित्यांची नियुक्ती केली आहे.

**विद्यापीठाची कामगिरी**

'आव्हान' या शिबिराचे संयोजन शिवाजी विद्यापीठाने सन २००७ मध्ये केले होते. यानंतर राज्यात विविध विद्यापीठात झालेल्या या शिबिरामध्ये विद्यापीठाने यश मिळवले. नागपूर येथे २०१४ मध्ये झालेल्या 'आव्हान' शिबिरामध्ये जनजागरण फेरीमध्ये उत्कृष्ट विद्यापीठाचा फिरता चषक पटकावला होता. गेल्या वर्षी पुणे येथे झालेल्या शिबिरात विद्यापीठाने उत्कृष्ट संघनायक (डॉ. धनंजय लोहार) आणि उत्कृष्ट स्वयंसेवक (शिवाजी जाधव) या विभागात यश मिळविले होते.

2 8 MAY 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठात 'ॲप' विकसित : बी.टेकच्या विद्यार्थ्यांचे संशोधन; शेतकऱ्यांचे नुकसान टाळता येणार**

# मोबाईलवर मिळणार आता पिकाचा अंदाज

तानाजी पवार ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सध्या संपूर्ण महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय गाजत आहे. शेतातून अपेक्षित उत्पन्न न मिळाल्याने कर्जात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढू लागले आहे; पण भविष्यात कोणते पीक घ्यावयाचे याचा अंदाज आला तर शेतकऱ्यांचे भविष्यातील नुकसानही मोठ्या प्रमाणात टाळता येणे शक्य आहे. त्याप्रमाणे शिवाजी विद्यापीठातील 'बी.टेक'च्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी 'ॲगड्रॉईड-ॲप' विकसित केले आहे. याद्वारे हवामान, पाणी, माती आणि पावसाचे प्रमाण याचा विचार करुन पुढील सहा महिन्यांत कोणते पीक घेता येईल हे शेतकऱ्यांना ठरविता येणार आहे.

राज्यात शेतकऱ्यांना नुकसानीस सामोरे जावे लागल्याने त्यांची आर्थिक कचाट्यातून मुक्ती न झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. या आत्महत्येचे लोण दिवसेंदिवस वाढतच आहेत, त्यामुळे कर्जमुक्ती करा म्हणून अनेक नेत्यांचा नारा सुरु आहे; पण शेतकऱ्यांच्या होणाऱ्या पीक नुकसानीवर उपाययोजना काढल्यास कर्जमाफीची गरजच भासणार नाही, तसा प्रयत्न शिवाजी विद्यापीठातील 'बी. टेक'च्या विद्यार्थ्यांनी केला आहे. त्यांनी 'ॲगड्रॉईड-ॲप' तयार करुन अडचणीतील शेतकऱ्यांना एक दिलासा दिला जाणार आहे.

ॲपमुळे शेतकऱ्याला आपल्या परिसरातील लागवड केलेल्या विविध पिकांची आवश्यक आणि मूलभूत माहिती पुरवून त्यांचे उत्पन्न वाढविण्यास मदत होईल. मातीची गरज, लागवडीची प्रक्रिया, हवामानातील गरज, पिके, रोग व कीड, खते आणि कीटकनाशके याविषयी या ॲपद्वारे माहिती शेतकऱ्यांना देता येणे सोपे होणार आहे. विशिष्ट पिकांसाठी किती क्षेत्र लागवड करायचे हे तो शेतकरी ठरवू शकतो, या ॲपद्वारे पिकांचे नियोजन करता येते, त्यामुळे शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या संकटांना सामोरे जावे लागणार नाही.

## बाजारपेठेची माहिती मिळणार

शेतकऱ्यांना विविध पिकांच्या बाजारातील किमतीची आवश्यक आणि मूलभूत माहिती पुरवून त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी मदत होणार आहे. ॲपवरील माहितीमुळे शेतकऱ्यांला पेरणी करणाऱ्या पिकांची निवड करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्याला अधिक नफा मिळेल, अशाप्रकारे शेतकऱ्यांना जीवनशैली सुधारण्यास मदत होईल. या 'ॲप'वरील नकाशाच्या मदतीने शेतकऱ्याला आपले उत्पादन विक्रीसाठी नजीकची बाजारपेठ शोधण्यास मदत होणार आहे.

## सरकारी योजनांचीही अद्ययावत माहिती

या ॲपद्वारे आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे ध्येय, अद्ययावत माहिती पुरवून शेतीमालामध्ये पारदर्शकता वाढविता येते. कृषी संबंधित कोणतीही योजना सरकार सुरु करत असल्यास त्याची अद्यायावत माहिती या ॲपद्वारे शेतकऱ्याला पुरवली जाणार आहे तसेच नवीन खते किंवा पीक रोगाबाबत माहिती पुरवली जाणार आहे.






"शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या अनुषंगाने हे 'ॲगड्रॉईड-ॲप' विकसित केले आहे. त्याबाबत अनेक शेतकऱ्यांशी चर्चा करून हे ॲप तयार केले आहे. हे ॲप येत्या पंधरा दिवसांत 'गुगल प्ले स्टोअर'वर उपलब्ध होईल.

**- प्रसन्न करमरकर,** सहायक प्राध्यापक, संगणक शास्त्र विभाग

## 'ॲगड्रॉईड-ॲप'साठी या विद्यार्थ्यांचे योगदान

'ॲगड्रॉईड-ॲप' विकसित करण्यासाठी सहायक प्राध्यापक प्रसन्न करमरकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले, तर त्यासाठी शिवाजी विद्यापीठ 'बी.टेक'च्या अंतिम वर्षातील विवेक कुरुवडे (रा. खांबित, ता. आस्ती, जि. वर्धा), कोमल हाबीवंत (रा. विटा, ता. खानापूर, जि. सांगली), श्रद्धा निंबाळकर (सातारा), शीतल कुलकर्णी (रा. हिंगणगड, ता. खानापूर, जि. सांगली), शहदमनी मोमीन (रा. इस्लामपूर, ता. वाळ्वा, जि. सांगली) यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 MAY 2017
पुढारी

# लोकविकास केंद्रामार्फत उद्यापासून बालसाहित्यिकांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्रामार्फत दि. २९ मे ते २ जून या कालावधीत दुपारी तीन ते सहा या वेळेत १० ते १३ वयोगटातील 'मुलांसाठी बालसाहित्य : सर्जनशील लेखन' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळेत मुलांमधील सर्जनशीलतेचा शोध व विकास याचा परामर्ष घेतला जाणार आहे. सर्जनशीलता व तिचे स्रोत याबाबतच्या संकल्पना स्पष्ट करून बालकविता, निबंध कथा व बाल नाटिका लिहिण्यासाठीची पूर्वतयारी करून घेतली जाणार आहे. अधिक माहितीसाठी लोकविकास केंद्राच्या डॉ. मंजुषा देशपांडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 MAY 2017
पुढारी

# म्युझिओलॉजी, कॉन्झर्वेशन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

**कोलहापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्यविभाग आणि राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने म्युझिओलॉजी कॉन्झर्वेशन या प्रशिक्षणवर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. ४ जूनपासून पुढची सहा महिने प्रत्येक रविवारी विद्यापीठ हायस्कूल, महालक्ष्मी मंदिर येथे हा वर्ग होणार आहे. भारतीय संस्कृती आणि ऐतिहासिक ठेवा जपण्यासाठी जुनी मोडी कागदपत्रे, ताम्रपट, शिलालेख यांचे वाचन व संशोधन करणे, मोडी लिपीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी शैक्षणिक ज्ञान प्रबोधन करणे अशा स्वरूपाचे कार्य सुरू आहे. इतिहासाचा एक भाग म्हणजे वस्तू संग्रहालय, अशा या वस्तू संग्रहालयाचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने या वर्गाचे आयोजन केले आहे. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी उदयसिंह राजेयादव, दिवाण बोळ, बिनखांबी गणेश मंदिर येथे संपर्क साधावा.